स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत
“राज्यशास्त्र” विषयातील पीएच.डी. पदवी करीता सादर
करण्यात येणारा संशोधन आराखडा.

“भारतीय राज्यघटनेतील राजकीय ध्येयवाद आणि वस्तूस्थिती”

संशोधक
माधव साहेबराव गडदे
एम.ए.राज्यशास्त्र, नेट-सेट

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी.डी. सूर्यवंशी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

स्वातंत्र्यसैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा.

संशोधन केंद्र
पिपल्स महाविद्यालय, नांदेड

2022

“भारतीय राज्यघटनेतील राजकीय ध्येयवाद आणि वस्तूस्थिती”

1. **प्रस्तावना** :-

आजचे युग हे लोकशाही शासनसंस्थेचे युग आहे. जगभरात एकतंत्री, हुकूमशाहीवर आधारीत राजवटी कोसळून पडत आहेत. याची प्रचिती आपल्याला इजिप्त, सिरीया, लिबीया, येथील घटनाक्रमांवरुन येते. जगभरातील लोकशाही संस्थांविषयी आस्था बाळगणारे नागरिक आपल्या हक्कांविषयी जागरुक झालेले असून संपर्कक्रांतीने त्यांना प्रचार-प्रसार करण्याचे एक विश्वव्यापी सभापीठ उपलब्ध करुन दिले आहे. याच हक्कांची नोंद वैधानिक पध्दतीनेही राज्यघटनेच्या माध्यमातून घेतली जात असते. नागरिकांच्या हक्क, कर्तव्यांची लिखित किंवा अलिखीत नोंद ज्या दस्तऐवजामध्ये करण्यात येते त्याला ‘राज्यघटना’ असे संबोधण्यात येते. वेगवेगळया मान्यवर विचारवंतांनी राज्यघटनेच्या व्याख्या केलेल्या आहेत. राज्यघटना राज्यघटनावादावर किंवा संविधानावाद या संकल्पनेवर आधारित संकल्पना आहे. संविधानवाद म्हणजे एक अशी राजकीय व्यवस्थेची संकल्पना की, जी संविधानावर आधारित असेल तसेच शासनसंस्थेचे अधिकार मर्यादीत असून त्यांना निश्चित विधीनियमांचे बंधन असते. सुभाष काश्यप यांच्यानुसार संविधानवाद म्हणजे, “संविधानवाद एक ऐसी राज्यव्यवस्थाकी संकल्पना है, जो संविधान के अंतर्गत हो तथा जिसमें सरकार के अधिकार सिमित और विधिके अधीन हो ।”[1] संविधानवादात शासनसंस्थेच्या वर्तनावर एक अंकूश लावलेला दिसून येतो. विशिष्ठ विधिनियम किंवा संकेतांना धरुनच शासनसंस्थेने मार्गक्रमण करणे बंधनकारक असते. याशिवाय सी.जे. फ्रेडरिक यांच्यानुसार, “संविधानवाद सत्तेची विभागणी करुन सरकारच्या कृतिस्वातंत्र्यावर प्रभावी मर्यादा घालतो. त्याचा अभ्यास करताना अशा मर्यादा घालणाऱ्या व टिकवून ठेवणाऱ्या कार्यपध्दतीचा व तंत्रांचा शोध अभ्यासकाला घ्यावा लागतो. शासनाला जबाबदार करुन सोडण्याच्या नियमावलींचा तो संच असतो.”[2] यावरुन शासनकर्त्यांच्या स्वैर व लहरी कृत्यांना अटकाव, शासितांच्या हक्कांची हमी आणि सार्वभौम सत्तेच्या अस्तित्वाची चौकट हे संविधानवादाचे तिन आयाम सांगता येतील. संविधानवादावरुन संविधान किवा राज्यघटनेचे स्वरुप विषद करता येते.

राज्यघटना ही कोणत्याही देशाचा सर्वोच्च कायदा असतो.[3] देशाच्या राज्यकर्त्यांना राज्यघटनेपासूनच शासन प्रशासनाच्या कार्यवाहीचे मार्गदर्शन मिळत असते. निरनिराळया विचारवंतांनी राज्यघटनेच्या व्याख्या केलेल्या आहेत. यामध्ये जेम्स ब्राइस नुसार राज्यघटना म्हणजे, ‘‘राष्ट्राच्या राज्यघटनेत अशा नियमांचा किंवा कायद्यांचा समावेश असतो. जे त्याचा शासन प्रकार निश्चित करतात आणि नागरिकांचे त्याच्याप्रत असलेले हक्क व कर्तव्ये त्याचप्रमाणे त्याचे नागरिकांप्रति असलेले हक्क व कर्तव्ये ठरवून देतात.’’[4] तसेच न्या. कुले यांनी राज्यघटनेची व्याख्या करतांना म्हटले आहे की, ‘‘ज्यात शासनाचा आधारभूत तत्वांचा समावेश असतो असा राज्याचा मूलभूत कायदा. ही तत्वेच सार्वभौम सत्तेची वाटणी करुन त्यापैकी प्रत्येक अधिकार कोणत्या व्यक्तीकडे सोपवायचा आणि त्यांनी तो कशाप्रकारे अंमलात आणायचा हे निर्धारीत करीत असतात.’’[5] म्हणजेच राज्यघटना हा त्या त्या राज्याचा मूलभूत कायदा असतो. जो विशिष्ट ध्येयाने प्रेरीत असतो. तसेच सत्तेची विभागणी केलेली आढळून येते. याशिवाय गिलख्रिस्ट यांच्या मते, ‘‘राज्यघटना म्हणजे, शासनाची रचना आणि अधिकार तसेच ते अधिकार चालवण्याबाबतची सर्वसाधारण तत्वे निश्चित करणारे लिखित वा अलिखित नियमावली किंवा कायदे म्हणजे राज्यघटना होय.’’[6]

वरिल व्याख्यांच्या प्रकाशात भारतीय राज्यघटनेचे निरीक्षण केले असता भारतीय राज्यघटना ही लिखित आणि निर्मित असून त्यात शासनाचे अधिकार आणि भारतीय जनतेचे हक्क नमूद केलेले आहेत. तसेच शासनाच्या रचनेची क्रिया आखून देऊन विविध शासनांगांचे अधिकार व कार्ये राज्यघटनेत ठरवून दिलेली आहेत. भारताची एक राष्ट्र म्हणून होणारी वाटचाल कोणत्या ध्येयाकडे कोणत्या मार्गाने होईल याचे दिग्दर्शन योग्य प्रकारे व विस्तृतपणे राज्यघटनेने कलमवार केलेले आढळते.[7] याशिवाय संविधान सभेतील चर्चा व वादविवाद या ध्येय किंवा मूल्यांबाबतचा तत्वविचार अचूक व सविस्तर विषद करतात. यासाठी संविधान सभेत पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी 13 डिसेंबर 1946 रोजी मांडलेला उद्दिष्टांचा ठराव (Objective Resolution)[8] तसेच भारतीय घटनेची उद्देशपत्रिका (Preamble) व मार्गदर्शक तत्वे[9] राज्यकर्त्यांना सदोदीत मार्गदर्शन करीत आली आहेत. उद्देशपत्रिकेतील राजकीय, सामाजिक, आर्थिक ध्येयवाद ज्यात स्वातंत्र्य, समता, बंधूता या मूल्यत्रयीबरोबरच सामाजिक, आर्थिक व

राजकीय न्याय, सार्वभौम समाजवादी प्रजासत्ताक इ. तत्वज्ञानाचा[10] समावेश होतो. या ध्येयसिध्दीची वाटचाल करणे राज्यघटनेची अंमलबजावणी करणाऱ्या राज्यकर्त्यांवर बंधनकारक आहे. घटनानिर्मात्यांच्या याच ध्येयवादाविषयी ऑस्टीन म्हणतात, "Yet all these men approached the drafting of the constitution in a practical rather than a theoretical way. They knew that the constitution must help to bring about the reform, the renascence of Indian society, that it must embody the national goals & subverse their achievement."[11] भारतीय न्यायव्यवस्थेनेही यांची अंमलबजावणी होण्यासाठी वेगवेगळया कालखंडात निरनिराळया निवाडयांमधून ह्याच घटनात्मक ध्येयवादाला अधोरेखित केलेले आहे.

2. **संशोधन समस्या** :-

भारतीय राज्यघटनेतून देशाच्या राज्यकर्त्यांसाठी आखून देण्यात आलेली उद्दिष्टे, ध्येय, व मुल्ये यांची ध्येयसिध्दी किती झाली याचा विष्लेषणात्मक व वस्तूस्थितीवर आधारीत अभ्यास होणे गरजेचे आहे. राजकीय म्हणजे राजकारण व शासन यांच्या संबंधीचा, ध्येयवाद म्हणजे आदर्शवाद किंवा ध्येयवाद म्हणजे Idealism होय तसेच वस्तुस्थिती म्हणजे वास्तववाद किंवा वास्तवरुप म्हणजे Realism होय[12] भारतीय राज्यघटना समस्त भारतीय नागरिकांस वेगवेगळया राजकीय, सामाजिक व आर्थिक सांस्कृतिक हक्कांची हमी देते. प्रत्येक नागरिकाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यघटनेमधील ध्येयवादाला समोर ठेवून आजवर किती वाटचाल झाली, यामध्ये काही त्रुटी, विसंगती राहीली का ? आव्हानांच्या व अडचणीच्या प्रसंगात राज्यकर्त्यांना राज्यघटनेतून आदर्श व प्रासंगिक मार्गदर्शन उपलब्ध झाले का ? इत्यादींचे भारतीय राज्यघटनेतील ध्येयवाद व वस्तुस्थितीव्दारे विष्लेषण करणे महत्वाचे ठरते. राज्यघटनेत नमूद आदर्श, मूल्ये व ध्येयवाद प्रत्यक्षात उतरण्यासाठी राज्यकर्ते व प्रत्यक्ष भारतीय नागरिक यांनी कोणते व कसे प्रयत्न केले याचाही अभ्यास होणे गरजेचे आहे. लोकशाही व्यवस्थेच्या सर्व घटकांनी ज्यात विधीमंडळ, न्यायमंडळ व कार्यकारी मंडळाने आपापल्या भूमिका व उत्तरदायित्व

कशाप्रकारे पार पाडले ? यांच्या अभ्यासातून या ध्येयवादाच्या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकता येतो. राज्यघटनेत नमूद ध्येयवादाच्या दिशेने वाटचाल होत असतांना समाजाच्या राजकीय परिस्थितीत कशा प्रकारे योग्य व परिणामकारक परिवर्तन घडून आले याचा वस्तुस्थितीव्दारेच अचूक निष्कर्ष काढता येतो. राज्यघटनेतील नमूद ध्येयवादाला नागरिकांनी कसा प्रतिसाद दिला तसेच या ध्येयवादासाठी कोणता आग्रह धरला ? व त्यासाठी राज्यघटनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने काय परिश्रम घेतले ? याचेही वस्तुस्थितीवर आधारीत अध्ययन महत्वाचे ठरते.

3. **अभ्यासाची उद्दिष्टे** :-

1. राज्यघटनेत नमूद राजकीय ध्येयवादाचा शोध घेणे.
2. संविधान निर्मात्यांच्या दूरदृष्टीचे वस्तुस्थितीवर आधारित अध्ययन करणे.
3. निरनिराळया परिस्थितीत राज्यघटनेतील ध्येय व मूल्यांची प्रासंगिकता तपासणे.
4. राज्यघटनेतील ध्येयवादाची वाटचाल कोणत्या दिशेने झाली हे समजावून घेणे.
5. राष्ट्राच्या उभारणीत राज्यघटनेतील ध्येयवादाचा अंतर्भाव जाणून घेणे.
6. जागतिक पटलावर एक राष्ट्र म्हणून भारताच्या राज्यघटनेतील ध्येयवादाची प्रासंगीकता तपासणे.
7. राज्यघटनेतील नमूद ध्येयवादानूसार भारतीयांच्या राजकीय जीवनात घडून आलेल्या परिवर्तनाचे वस्तूस्थितीवर आधारीत परिशिलन करणे.
8. राज्यघटनेत नमूद लोकशाही मूल्यांचा व्यक्ती, संस्था व समाज पातळीवर घडून आलेल्या परिणामाची नोंद घेणे.
9. लोकशाही राजकीय व सामाजिक संस्थांची वस्तुस्थितीवर आधारीत वाटचाल तपासणे.
10. भारतीय राज्यघटनेतील ध्येयवादाप्रति नागरिक व शासनकर्त्यांची निष्ठा वस्तुस्थितीवर जाणून घेणे.

4. अभ्यासाचे महत्व :-

भारतीय राज्यघटना हा देशाच्या नागरिकांच्या हक्क व कर्तव्यांची जाणीव करुन देणारा दस्तऐवज आहे. हा दस्तऐवज निर्माण झाल्यापासून वेळोवेळी निर्माण झालेल्या पेचप्रसंगात कितपत मार्गदर्शक व प्रासंगीक ठरला हे राज्यघटनेतील ध्येयवाद व त्याच्या वस्तूस्थितीच्या अध्ययनानेच समजून येते. ऑस्टीन यांच्या मतानुसार, "Because the constitution is in hourly use as a benchmark & measuring stick for citizens and officials, touching lives in ways great and small, learning of its working truly opens a window into India"[13] राष्ट्राच्या ईच्छा, आकांक्षांचे प्रतिबिंब राज्यघटनेत पडले आहे का ? घटनेत नमूद मूल्यांप्रती नागरिक म्हणजे शासित व राज्यकर्ते म्हणजे शास्ते अशा दोघांनीही कशा प्रकारे निष्ठा दाखवली याचे विवेचन या अभ्यासाव्दारे करणे शक्य होणार आहे. आणखी असे की, वेगवेगळया कालखंडांनुसार आवश्यक असणाऱ्या बदलांना स्विकारण्यासाठी राज्यघटना, राज्यकर्ते व नागरिक परस्परांना पूरक ठरुन हया ध्येयवादाची मांडणी किती खंबीर पायावर उभी होती याचेही अध्ययन करता येते.

5. अभ्यासाची गृहितकृत्ये :-

1. भारतीय राज्यघटनेतील ध्येयवाद आजही प्रासंगीक आहे.
2. भारतीय राज्यघटनेतील राजकीय ध्येयवादानुसार देशाची वाटचाल सुरु आहे.
3. शासनसंस्थांच्या तिनही अंगांनी आपापले उत्तरदायित्व समर्थपणे पार पाडले आहे.
4. भारतीय राज्यघटनेतील ध्येयवाद व्यक्ती, समाज, व संस्था इ. च्या वर्तनाचा भाग बनून गेला आहे.
5. भारतीय राज्यघटनेतील नमुद ध्येयांच्या सिध्दीसाठी व्यक्ती, समाज व संस्थांचे वेळोवेळी प्रयत्न झालेले आहेत.

6. व्यक्ती, समाज व संस्थांच्या विकासाच्या उन्नतीचा मार्ग राज्यघटनेतील ध्येयवादात नमूद केलेला आहे यावर नागरिक, राज्यकर्ते यांची अढळ निष्ठा आहे.
7. व्यक्ती व समाजाच्या समस्या मांडण्यासाठी व सोडवण्यासाठी राज्यघटनेत नमूद मार्गांचाच उपयोग करण्यात आलेला आहे.
8. राज्यघटनेत नमूद ध्येयवादाच्या अंमलबजावणीसाठी नागरिकांनी आग्रह धरलेला आहे.
9. निरनिराळया प्रसंगी राज्यकर्त्यांना राज्यघटनेतून ध्येयवादाच्या सिध्दीसाठी अचूक व योग्य मार्गदर्शन मिळालेले आहे.
10. बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यात राज्यघटनेतील ध्येयवाद यशस्वी ठरला आहे.

6. **संशोधन पध्दती** :-

प्रस्तुत अध्ययन भारतीय राज्यघटनेतील तत्व आणि व्यवहार या दोन्ही पातळीवरील विश्लेषण अशा स्वरुपाचे असल्यामुळे या अध्ययनात ऐतिहासिक विश्लेषणात्मक व अनुभवजन्य पध्दतींचा[14] अवलंब करण्यात येऊन निष्कर्षाप्रत जाण्याचा प्रयत्न केला जाईल. राज्यघटनेतील नमुद ध्येयवादाचे निटपणे आकलन करुन घेण्यासाठी राज्यघटनेची प्रत्यक्ष जडणघडण होत असतांना कोणकोणत्या व्यक्ती, संस्था त्यात सहभागी झाल्या होत्या. भारतीय राज्यघटनेतील ध्येयवादाबद्दल घटना समितीत काय व कशी चर्चा झाली होती. हा ध्येयवाद मांडत असतांना घटनाकर्त्यांनी घटनासमिती सभासदांनी काय मते व्यक्त केली होती. याबाबतचा आढावा घेण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधन कार्य राज्यघटनेत नमुद ध्येयवादाचे केवळ तात्विक विवेचन करत नसल्यामुळे ऐतिहासिक पध्दती परिपूर्ण ठरत नाही. तेव्हा व्याव्हारिक पातळीवर राज्यघटनेतील नमूद राजकीय, ध्येयवादाची वस्तूस्थिती चिकित्सकपणे मांडणे अनिवार्य असल्यामुळे विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर अभिप्रेत आहे. अशी राज्यघटनेतील ध्येयवादाची विश्लेषणात्मक मांडणी करत असतांना यात महत्वाचा भाग समाविष्ट होतो तो म्हणजे व्यक्ती, समाज व संस्था यांच्या जीवनात घडून आलेले राज्यघटनेतील ध्येयवादावर आधारीत परिवर्तन यासाठी निरनिराळया समित्या, आयोग, कायदे यातून हा ध्येयवाद कसा

आकारास आला व प्रत्यक्षात आला. याबाबतची मांडणी करण्यासाठी अनुभव जन्य पध्दतीचाही अवलंब करणे महत्वाचे ठरते.

प्रस्तूत संशोधन कार्यात वरील तिनही पध्दतीने अध्ययन करण्यासाठी प्राथमिक तसेच व्दितीय स्त्रोत, प्रश्नावली, मुलाखती या पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. भारतीय राज्यघटनेतील राजकीय, ध्येयवादाबदल मूळ तरतुदी या ध्येयवादाच्या सिध्दीसाठी भारतीय संसद व घटकराज्यांच्या विधिमंडळानी संमत केलेले कायदे, निरनिराळया शासनांनी गठीत केलेल्या विविध समित्या व आयोगांचे अहवाल, भारतीय राज्यघटना (Indian Constitution), राज्यघटनेची जडणघडण व निर्मिती होत असतांना घटना समितीत सदस्यांनी माडलेली मते व चर्चा यांच्या भाषणांचा भारतीय संविधान सभेतील चर्चा (Constitution assembly debates) ध्वनीफीती, तत्कालीन नियतकालीके, घटना समिती सदस्यांचा पत्रव्यवहार, न्यायालयीन निवाडे इ. चा प्राथमिक स्त्रोत म्हणून वापर करण्यात येईल. तसेच वस्तूस्थितीवर आधारित अध्ययन करत असतांना महत्वपूर्ण घटनादुरुस्ती, घटना इत्यादी प्रकर्षाने जाणवणाऱ्या मुद्यांच्या आधारे वस्तूस्थितीचे अध्ययन करण्यात येईल. तसेच प्रकर्षाने जाणवणाऱ्या वचित घटकांची वस्तूस्थिती व त्याची पुर्तता यांचे अध्ययन करण्यात येईल.

व्दितीय स्त्रोतांमध्ये भारतीय राज्यघटने संबंधाने लिहिलेल्या विविध संदर्भग्रंथ, संशोधन पत्रिकेत, वृत्तपत्रात प्रसारीत झालेले लेख, भारतीय विद्यापीठांमधील प्रकाशीत, अप्रकाशीत शोधप्रबंध व शोधनिबंधांचा देखील प्रस्तुत शोधकार्यात आधार घेतला जाईल.

क्षेत्र अभ्यास व फिल्डवर्क असेही काही अंशी या अध्ययनाचे स्वरुप असल्याने विविध शासकीय ग्रंथालयांस भेटी देणे. उदा. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्र, विधानमंडळ ग्रंथालय, संसदीय ग्रंथालय नवी दिल्ली आणि ज्या विद्यापीठ व संशोधन संस्थांमधुन भारतीय राजकीय प्रक्रियांचे अध्ययन करण्यात येते अशा विद्यापीठ ग्रंथालयांचाही आधार प्रस्तूत अध्ययनात घेतला जाईल. वरिल सर्वच स्त्रोतांचा उपयोग करुन गृहितकृत्यांची तपासणी केली जाईल व शेवटच्या प्रकरणात निष्कर्ष नोंदवले जातील.

7. संशोधन आराखडा :-

1. **प्रकरण पहिले :-** **प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन पध्दती, संशोधन क्षेत्र, नमुना संकलन, सदर्भ साधने, संशोधन पध्दतीचे विश्लेषण करण्यात येईल. या विषयावर विविध लेखक, विचारवंत, संशोधकांनी लिहिलेल्या संशोधन पूर्व साहित्यांचा आढावा घेण्यात येईल.

2. **प्रकरण दुसरे :-** **भारतीय राज्यघटनेची जडणघडण व निर्मिती प्रक्रिया**

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारताचा शतकभरातील घटनात्मक विकास, राज्यघटनावादाकडे भारताची वाटचाल इत्यादीचा थोडक्यात आढावा व विकास माडण्यात येईल. भारतीय घटना समितीची रचना त्यातील समिती पध्दत, संविधानाचा स्वीकार व प्रजासत्ताकाची निर्मिती मांडण्यात येईल.

3. **प्रकरण तिसरे :-** **भारतीय राज्यघटनेतील राजकीय ध्येयवाद**

प्रस्तुत प्रकरणात विविध मुद्यांच्या आधारे राज्यघटनेतील राजकीय ध्येयवादाशी संबंधीत तरतुर्दीची चर्चा होईल. शोध घेण्यात येईल. यामध्ये राजकीय लोकसहभाग, लोकशाहीचे विकेंद्रीकरण, निष्पक्ष निवडणूका, प्रतिनिधीगृहातील राखीव जागा इ. संबंधी राज्यघटनेतील तरतूर्दीचा शोध घेण्यात येईल. या तरतुर्दीमधील ध्येयवाद भारतीय राज्यघटना, संविधान सभेतील चर्चा यांच्या आधाराने मांडण्यात येईल. यासाठी आखुन दिलेला मार्ग, उपाय, सूचना इ. मांडणी करण्यात येईल.

4. **प्रकरण चौथे :-** **भारतीय राज्यघटनेतील राजकीय ध्येयवादाची वस्तूस्थिती**

भारतीय राज्यघटनेतील राजकीय ध्येयवादाच्या वस्तूस्थितीची पडताळणी या प्रकरणात केली जाईल. विविध संदर्भग्रंथ, शोधनियतकालीके, शोधप्रबंध, आयोग, समित्या इ. आकडेवारी, वृतपत्रे, नियतकालीकातील प्रकाशित लेख, विविध प्रतिनिधीगृहे, स्थानिक संस्था इ. तील प्रतिनिधीत्व यावर आधारित ध्येयवादाची वस्तूस्थिती तपासून मांडण्यात येईल.

5. **प्रकरण पाचवे :-** **निष्कर्ष , शिफारशी**

संशोधनाअंती प्रमाणशीर अध्ययनावर आधारित निष्कर्ष काढण्यात येतील. राजकीय ध्येयसिध्दीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक व अध्ययनातून जाणवलेल्या शिफारशी व उपाययोजना सूचवण्यात येतील.

संदर्भग्रंथसूची :-

1. काश्यप सुभाष, हमारा संविधान, 2006,एन.बी.टी. इंडिया, पाँचवी आवृत्ती, पृष्ठ-2
2. भोळे, भा.ल.,2011, शासन आणि राजकारण: तौलनिक अध्ययन, पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर, सहावी आवृत्ती, पृष्ठ-43
3. चौबे, शिवानी किंकर,2016, भारतीय संविधान रचना एवं कार्य, (अनु.) के.बी. सिंह, एन.बी.टी. इंडिया, तिसरी आवृत्ती, पृष्ठ- 16.
4. भोळे, भा.ल.,2011, शासन आणि राजकारण: तौलनिक अध्ययन, पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लीशर्स, नागपूर, सहावी आवृत्ती, पृष्ठ-60
5. कित्ता, पृष्ठ - 60
6. कित्ता, पृष्ठ - 60
7. विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार, 2014, भारताचे संविधान, व्दिभाषा आवृत्ती, सातवी आवृत्ती.
8. Moon, Vasant (Edi.),1994, Dr.Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol-13, Education Dept. Govt.of Maharashtra, First Edition, Page - 6
9. विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार, 2014, भारताचे संविधान, व्दिभाषा आवृत्ती, सातवी आवृत्ती.
10. Basu D.D., 2013, Introducation ot Constitution of India, Nexis-Nexis, Gurugaon, 21st Edition, Page 20.

11. Austene, Granville, 2017, Indian Constitution-Cornerstone of a Nation, Oxford UniversityPress, 29th Edition, Page -26.

12. देशपांडे ना.र., (संपा.), 1986, राज्यशास्त्र परिभाषा कोष, भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पहिली आवृत्ती, पृष्ठ - 52,92 .

13. Austene, Granville, 2017, Working a Democratic constitution, Oxford UniversityPress, Ninth Impression, Introduction Page - 1.

14. डॉ. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

संशोधक

माधव साहेबराव गडदे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पी.डी. सूर्यवंशी
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
स्वातंत्र्यसैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा.